
खास मुलांसाठी लिहिलेलें

# गोष्टीरूप महाभारत

मालती सागर S.T.C

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भा.वा.
ग्रा. क्र. ७५५५६



IRBK-0116556
IRBK-0116556

र साहित्य-प्रकाशन,
पुणें २

खास मुलांसाठीं तज्ज्ञ शिक्षिकेडून लिहून घेतलेलें

# गोष्टीरूप महाभारत

(भरपूर चित्रांसह)

-: लेखिका :-

सौ. विजयमाला सागर, बी. ए.

IRBK-0116556

**रम्यकथा प्रकाशन,**

३९२ नारायण पेठ, कान्हेरे बिल्डिंग, पुणे २.

किमत : १। रुपया

प्रिय वाचक,

अंदाजें ९ ते १० वर्षांच्या मुलांना अत्यंत आवडेल व त्यांच्या मनावर श्रेष्ठ मनोरंजनाबरोबरच उत्तम संस्कारहि करील अशा प्रकारचें हें 'गोष्टीरूप महाभारत' आम्हीं मुद्दाम तज्ज्ञ शिक्षिकेकडून तयार करवून घेऊन नि सिद्धहस्त कलाकारांकरवीं अंतर्बाह्य आकर्षक बनवून अत्यंत सुटसुटीत स्वरूपांत आमच्या बालवाचकांपुढें ठेवीत आहोंत.

पुस्तक मनाप्रमाणें हातावेगळें झाल्याचा आनंद आम्हांस मनोमन प्रतीत होत आहे. आमच्या छोटया दोस्तांस हें पुस्तक अत्यंत आवडेल याबद्दल तर आम्हांस मुळींच शंका नाहीं, परंतु जर वडील मंडळींसहि हें पुस्तक आवडलें तर आमच्या श्रमांचें चीज होण्यास प्रत्यवाय उरणार नाहीं.

आशा आहे कीं बहुसंख्य गुणज्ञ नि रसिक ग्राहक आमच्या अपूर्व श्रमांचें सार्थक नि हौसेचें कौतुक करतील !

अकराव्या आवृत्तीचा सुयोग पुन्हां इतक्या लवकर आला यावरूनच पुस्तक सर्वत्रांस आवडल्याचें सिद्ध होतें. गुणज्ञ ग्राहकांचा मी मनःपूर्वक आभारी आहें.

—प्रकाशक

---


प्रकाशक :
वा. ग. मेहेंदळे
रम्यकथा प्रकाशन,
३९२ नारायण पेठ, पुणें–३०

: मुद्रक
वा. ग. मेहेंदळे
जयभारत मुद्रणालय,
५५१ बुधवार, पुणें २.


(पुनर्मुद्रणादिक सर्वाधिकार प्रकाशकाच्या स्वाधीन)


प्रथमावृत्ति : १९६४

आवृत्ति दहावी : १९७४

आवृत्ति अकरावी : जुलै १९७५

# गोष्टीरूप महाभारत

श्रीगणेशाय नमः

आरंभीं आपण श्रीगणेशाला नमस्कार करूं या. कारण व्यासांनीं महाभारत सांगितलें व श्रीगजाननानें तें लिहून काढलें.



## १. हे व्यास कोण ?

व्यास हे पराशर मुनींचे चिरंजीव. (म्हणजे मुलगा.) एकदां काय झालें, यमुना नदीच्या तीरावर पराशर मुनि उभे होते. यमुना नदींत एक तरुणी होडी हांकारीत होती. अतिशय मोहक डोळ्यांची ती तरुणी होती. ती तरुणी देखणीसुद्धां होती; पण तिच्या अंगाला माशांचा वास येत होता. कारण तिचा धंदा मासे पकडण्याचा होता. अशी ही तरुणी होडी हांकारीत होती आणि पाण्यांत जाळें टाकीत होती. मासे पकडीत होती. पावसाचा रंग दिसत होता; कारण आभाळ भरून आलें होतें. त्यामुळें जाळ्यांत मोठा मासा कांहीं येईना !

इतक्यांत पावसाला सुरुवात झाली. पराशर मुनि पावसानें भिजूं लागले. ते त्या तरुणीला हांक मारूं लागले–

'ए तरुणी, होडी घेऊन या तीराला ये. मला पलीकडच्या तीराला जायचें आहे.'



तरुणीनें मुनींची हांक ऐकली. तिनें रिकामें जाळें ओढलें. होडी हांकारून ती पराशर मुनींजवळ आली. मुनि होडींत बसले. होडी चालूं झाली. पावसाच्या सरीवर सरी येत होत्या. पराशर मुनि त्या तरुणीकडे पहात होते. ती तरुणीहि मुनींकडे पहात होती. मुनींनां ती तरुणी आवडली व तरुणीला मुनि आवडले. पराशर मुनींनीं तरुणीच्या अंगाला येणारा माशांचा वास नाहींसा केला, आणि तिच्या अंगाला चांगला वास येईल असें केलें.

आतां तरुणीच्या अंगाचा चांगला वास लांबवर पसरूं लागला म्हणून तिला योजनगंधा म्हणूं लागले. योजनगंधा आणि पराशर यांचें लग्न लागलें. योजनगंधेचें अगोदरचें नांव होतें सत्यवती. पण लोक तिला म्हणत मत्स्यगंधा, कारण तिच्या अंगाला माशांचा वास येत होता.

पराशर मुनि आणि योजनगंधा यांच्या मुलाचें नांव व्यास. या व्यासांनींच महाभारत रचलें व तोंडानें श्रीगणपतीला सांगितलें. म्हणून आपण महाभारत ग्रंथाचे लेखक गणपति व रचणारे श्रीव्यास यांना नमस्कार करूं.

## २. महाभारतांत कोणाची कथा आहे?

महाभारतांत कौरव–पांडवांची कथा आहे. कौरव होते शंभर आणि पांडव होते पांच. कौरव व पांडव एकमेकांचे चुलत भाऊ.

कौरव व पांडवांचा मूळ पुरुष भरत हा पराक्रमी राजा होता. भरताच्या नांवावरूनच आपल्या देशाला भारत नांव पडलें. या आपल्या आवडत्या भारतांत, मोठ्या भारतांत, महाभारतांत कौरव–पांडवांची कथा व्यासांनीं रचली.

श्रीव्यासांनीं महाभारत देववाणींत म्हणजे संस्कृतांत रचिलें. या मूळ महाभारतावरून आपल्या देशांतल्या सगळ्या भाषांत महाभारताचें भाषांतर झालें आहे.

मराठी, गुजराथी, बंगाली, हिंदी, कानडी वगैरे सर्व भारतीय भाषांत महाभारत कथा आहे, इतकेंच नव्हे तर इंग्रजी, फ्रेंच, जर्मन वगरे भाषांतहि ही महाभारत कथा आहे.

इतकी आहे ही महाभारत कथा गोड आणि प्रसिद्ध. आतां आपण कौरवांच्या आई-वडिलांची कथा ऐकूं.

## ३. धृतराष्ट्र आणि गांधारी व कौरव

धृतराष्ट्र नांवाचा राजा जन्मापासून आंधळा होता. धृतराष्ट्राच्या वडिलांचें नांव विचित्रवीर्य. आईचें नांव अंबिका.

भीष्म हे धृतराष्ट्राचे चुलते. धृतराष्ट्र मोठा झाला, म्हणजे धृतराष्ट्र लग्न करण्याजोगा झाला. भीष्म धृतराष्ट्रासाठीं मुलगी पाहूं लागले, कारण धृतराष्ट्राचा बाप वारला होता.

भीष्मांनीं सुबलाशीं सोयरीक ठरविली. सुबल हा गांधार देशाचा राजा. सुबलाच्या मुलीचें नांव गांधारी.

धृतराष्ट्र हा हस्तिनापूरच्या राजाचा मुलगा आणि गांधारी ही गांधार देशाच्या राजाची मुलगी. आपल्या घराण्याप्रमाणें, आपल्या

मनाप्रमाणें, आपल्या योग्यतेप्रमाणें जांवई मिळाला म्हणून सुबल राजाला समाधान वाटलें. सुबलाचा मुलगा शकुनि यालाहि आनंद झाला कीं, मोठ्या राजघराण्यांत माझी बहीण दिली.

तरी पण भावानें व बापानें गांधारीला विचारलें. गांधारीला धृतराष्ट्र पसंत होता. गांधारी आपल्या वडिलांना म्हणाली, ' माझा पति जन्मापासून आंधळा आहे; म्हणून मीसुद्धां आंधळीं बनतें.'



आणि तेव्हांपासून गांधारी मुद्दाम आंधळी बनली. गांधारीनें आपल्या दोन्ही डोळ्यांवरून कापडाची जाड पट्टी बांधली. नवऱ्या-साठीं गांधारी मुद्दाम जन्मभर आंधळी बनली.

गांधार देशाच्या राजाचें वऱ्हाड आलें. राजा आला, राणी आली नवरीचा भाऊ शकुनि आला. नवरी मुलगी गांधारी आंधळी बनून आली !

हस्तिनापूरच्या लोकांना नवल वाटलें. भीष्मांनीं गांधारीचें कौतुक केलें. मोठ्या थाटांत धृतराष्ट्र आणि गांधारी यांचें लग्न

लागलें. गांधारीचें कौतुक हस्तिनापूरचे लोक करीतच होते. कांहीं काळानंतर गांधारीला मुलगा झाला. हा दुर्योधन.

जन्मल्याबरोबर दुर्योधन गाढवासारखा ओरडूं लागला! आभाळांतून रक्ताचा पाऊस पडूं लागला! धरणीमाता म्हणजे पृथ्वी गदगदां हलूं लागली! त्यामुळें लोक भीतीनें कांपूं लागले. दाही दिशा धुक्यानें भरून गेल्या. घुबडें ओरडूं लागलीं आणि कुत्रीं विव्हळून रडूं लागलीं. असा एकच गोंधळ उडाला.

दुर्योधनासारखेंच दुष्ट व अभिमानी असे एकूण शंभर मुलगे व एक मुलगी अशीं अपत्यें गांधारीला झालीं. या गांधारीच्या शंभर मुलांना व एका मुलीला कौरव म्हणूं लागले.

## ४. भरत ते पांडव

भरत नांवाच्या राजावरून आपल्या देशाला भारत नांव पडलें हें तुम्हांला माहीतच आहे. या भरत राजानंतर त्याच्याच कुळांत शंतनु नांवाचा एक राजा झाला. शंतनूला तीन मुलगे होते.


एकाचें नांव देवव्रत. देवव्रतानें बापाला वचन दिलें कीं, मी लग्नहि करणार नाहीं आणि राज्यहि करणार नाहीं. व याप्रमाणें तो वागला. म्हणजे त्यानें लग्नहि केलें नाहीं व राज्यांत वांटाहि मागितला नाहीं. अशा कडक रीतीनें तो वागला म्हणून लोक देवव्रताला भीष्म म्हणूं लागले.

शंतनूच्या दुसऱ्या मुलाचें नांव चित्रांगद. हा एका लढाईंत ठार झाला.

शंतनूच्या तिसऱ्या मुलाचें नांव विचित्रवीर्य. तेव्हां शंतनूनंतर विचित्रवीर्य गादीवर बसला. ही गादी कुठें होती? ही राजधानी कुठें होती? असें आपण विचाराल तर त्याचें उत्तर असें—

ही राजधानी हल्लींच्या दिल्ली शहराजवळ होती. इंद्रप्रस्थ' हें त्या राजधानीचें नांव.

शंतनूचा धाकटा मुलगा विचित्रवीर्य हा इंद्रप्रस्थाच्या गादीवर बसला. भारताच्या पवित्र सिंहासनाची मालकी विचित्रवीर्याकडे आली.




विचित्रवीर्याला तीन मुलगे झाले. पहिला धृतराष्ट्र. हा जन्मापासून आंधळा होता. दुसरा पंडू आणि तिसरा विदुर.

पंडूला दोन बायका होत्या. एकीचें नांव कुंती आणि दुसरीचें नांव माद्री.

कुंतीला तीन मुलगे झाले. पहिला युधिष्ठिर किंवा धर्म, दुसरा अर्जुन आणि तिसरा भीम.

माद्रीला दोन मुलगे झाले. नकुल आणि सहदेव. पंडूच्या पांची मुलांना लोक पांडव म्हणूं लागले. पांडव पांच—१ धर्म, २ भीम, ३ अर्जुन, ४ नकुल, ५ सहदेव.

नंतर लवकरच पंडू मरण पावला. माद्री पंडूबरोबर सती गेली. पंडूनंतर आंधळा धृतराष्ट्र इंद्रप्रस्थाच्या गादीवर बसला.

## ५. देव तारी त्याला कोण मारी ?

धृतराष्ट्र राजा झाला. कौरव व पांडव या चुलत भावंडांत युधिष्ठिर किंवा धर्म हा वडील होता धर्म वडील असून चांगल्या गुणाचा होता. नुसताच वयानें मोठा नव्हता. म्हणून धर्माला युवराजाची जागा मिळाली. तेव्हांपासून दुर्योधनाच्या अंगाची लाही-

लाही झाली आणि पांडवांचा कसा नाश होईल याचा विचार तो करूं लागला.

दररोज पांडव–कौरव खेळण्याच्या निमित्तानें जमत आणि त्यांत कौरवांचा पराभव होई. पांडव पांच व कौरव शंभर असून त्यांचा पराभव होण्याचें कारण म्हणजे बळकट भीम. भीम या मुलांत हत्तीसारखा दिसे. तो झोंबाझोंबी करूं लागला कीं, साऱ्या कौरवांना धरणीवर लोळवायचा.


माणकांच्या गोटया, रत्नांचे चेंडू, भोंवरे, चकारी, विटीदांडू यांच्या खेळांत भीमामुळें पांडवांचा जय होई आणि कौरवांवर बाजू येई. भीम कौरवांना बोकडच म्हणायचा. अगदीं मठ्ठ आहांत असेंहि म्हणायचा; यामुळें चिडून कौरव भीमाला रेडा म्हणायचे आणि दुर्योधन, दु शासन वगैरे कौरव आणि शिवाय त्यांचा मामा शकुनि भीमाची गठडी वळवूं पहायचे. पण भीम कसला वस्ताद ! तो मुसंडी मारून कौरवांचें थोबाड फोडायचा !

कधीं कधीं कौरव–पांडव परस्परांना हवेंत फेंकायचे. भुईवर आपटायचे व पाण्यांतहि बुडवायचे.

असेच एकदां कौरव फराळाचे पदार्थ घेऊन आले. लाडू, मोदक, शिरा, शंकरपाळी वगैरे गोडीचे आणि तिखटाचे खमंग पदार्थ होते. पांडव व कौरव फराळाला बसले. दुर्योधन स्वत: वाढूं लागला, गोड बोलूं लागला आग्रह करूं लागला त्यानें व शकुनीनें भीमाला आग्रह करकरून विष घातलेले मोदक भरपूर खाऊं घातले.

भरपूर फराळ झाल्यावर कौरव म्हणाले, 'आतां आपण थोडा वेळ आराम करूं.' जवळच्या वनांत ते आराम करूं लागले. पांडव व कौरवांपैकीं बहुतेक घोरायलाहि लागले, पण शकुनि, दु:शासन व दुर्योधन सावधच होते. त्यांनीं वेली काढल्या आणि भीमाला त्या वेलींनीं करकचून आंवळून टाकलें. आणि त्या वेशुद्ध भीमाचें मोटकुळें डोहांत फेंकून दिलें.

दिवस कलल्यावर सगळे कौरव व पांडव झोंपा आटोपून खेळावयास सरसावले, पण भीम कुठें होता ? पांडव दु:खी झाले



आणि कौरवांनीं दुःखाचें सोंग केलें. त्या दिवशीं न खेळतांच सारे राजवाड्याकडे आले.

पांडव भीमाबद्दल दुःख करीत असतांनाच चार आठ दिवसांत भीम परत आला. तो आपल्या भावांना सांगू लागला—

'डोहांतल्या विषारी नागांनीं मला चावे घेतल्यानें माझें विष उतरलें. कारण विषानें विष उतरतें. मी सावध होतांच माझ्या अंगाला करकचून बांधलेल्या वेली मीं तोडून टाकल्या आणि डोहाबाहेर पडूं लागलों, तोंच नागराजानें मला आग्रहानें ठेवून घेतलें आणि मला हजारपट बळ येईल असें सुंदर औषध दिलें.'

धर्म म्हणाला, 'भीमा, तुझें होतें तेवढेंच बळ अनेकांना पुरून उरत होतें आम्हांला तुझ्या बळाचें कांहीं वाटत नाहीं, पण देवानें तुला तारलें याबद्दल त्याचे आम्ही कसे उतराई होणार? असो. 'देव तारी त्याला कोण मारी!' असें म्हणतात त्याची खात्री आज सगळ्यांना पटली.

## ६. द्रोणाचार्य

कौरव-पांडवांचीं जेवणें झालीं आणि त्यांनीं विटीदांडूचा खेळ मांडला. खेळतां खेळतां त्यांची विटी उडाली व एका विहिरींत पडली. विहीर कोरडी, पण खोल होती. कोणालाहि विहिरींतून विटी काढतां येईना. ती त्याच वाटेनें येणाऱ्या द्रोणाचार्यांनीं काढली.

विटी कशी काढली? व विटी काढणारे द्रोणाचार्य कोण?

द्रोणाचार्यांनीं एक दर्भ मंत्रून विहिरींत टाकला. थोड्याच वेळांत दर्भ विटी घेऊन ती ढकलीत ढकलीत वर आला!

कौरव-पांडवांना नवल वाटलें. त्यांनीं ही हकीकत आपले आजोबा भीष्म, ह्यांना सांगितली.

भीष्मांनीं द्रोणांना राजवाड्यांत बोलावून आणलें.

भीष्म : यावं गुरुजी, आसनावर बसावं.

(द्रोणाचार्य आसनावर बसतात.)



भीष्म : आपली माहिती सांगाल तर बरें होईल.

द्रोण : मी गंगातीरीं रहाणाऱ्या भरद्वाजाचा मुलगा. माझें नांव

द्रोण. मी आणि पांचाळ देशाचा राजपुत्र असे दोघे अग्निवेश गुरूंपाशीं (धनुष्यबाणांच्या लढाईची म्हणजे) धनुर्विद्या शिकलों.
भीष्म : आणखीं काय येतें आपल्याला ?
द्रोण : सारी अस्त्रविद्या.
भीष्म : वा ! फारच उत्तम ! पण ही अस्त्रविद्या आपणांला कोणी शिकविली ?
द्रोण : प्रत्यक्ष परशुरामांनीं.
भीष्म : आपल्याला आणखीं कोण कोण आहे ?
द्रोण : कृपाचार्यांची बहीण कृपी, ती माझी बायको आणि अश्वत्थामा नांवाचा मुलगा.
भीष्म : ठीक ठीक ! आचार्य, आपण आमचे नातू जे कौरव–पांडव त्यांना उत्तम शिक्षण द्याल यांत शंका नाहीं. आपल्या कुटुंबांची सारी व्यवस्था आतां आमच्याकडे लागली.
द्रोण : शिकवणें, विद्यादान करणें हा माझा धर्मच आहे.
भीष्म : (प्रधानाकडे वळून) प्रधानजी, आचार्यांसाठीं उत्तम घराची व त्यांच्या अन्नवस्त्राची व दुधाची व्यवस्था करा. त्यांना कांहींहि कमी पडतां कामा नये.
प्रधान : आज्ञा महाराज.

(द्रोण राजवाड्यांतून बाहेर पडत असतांनाच कौरव–पांडव त्यांना भेटतात. कौरव–पांडवांना फार आनंद झालेला असतो.)


## ७. *अश्वत्थामा*

द्रोणांनीं धनुर्विद्येचें शिक्षण अग्निवेश गुरूंकडून घेतलें. अस्त्र-विद्येचें शिक्षण परशुरामांकडून घेतलें. यानंतर आपल्याला चांगले दिवस येतील असें द्रोणाचार्यांना वाटलें, पण इतकें शिकूनहि त्यांना आपल्या मुलाला दूधहि देतां येत नसे.

अश्वत्थाम्याची आई कृपी ही पिठांत पाणी घालून ‘ हें घे दूध ’ असें अश्वत्थाम्याला म्हणायची व अश्वत्थाम्याला दुधाची चव माहीत नसल्यानें तो तें पिठाचें पाणी प्यायचा.

अश्वत्थामा एक दिवस शेजारीं खेळायला गेला. शेजारी होता

खूप श्रीमंत. श्रीमंताच्या मुलाला त्याच्या आईनें सोन्याच्या वाटीं-तून दूध प्यायला दिलें. अश्वत्थामाहि तेथें दूध प्याला.




दुसरे दिवशीं आईनें त्याच्यापुढें पिठाचें पाणी ठेवल्याबरोबर व त्याची चव घेतांच 'हें कसलें दूध!' असें म्हणून तो रडूं लागला, द्रोणाचार्यांना वाईट वाटलें.

द्रोण म्हणाले, 'मी इतका शिकलों-सवरलों; तरी माझ्या मुलाला दूध मिळूं नये ना? मला एकहि गाय पाळतां येऊं नये! तें कांहीं नाहीं. माझा बालमित्र राजपुत्र द्रुपद आहे. त्याचीच भेट घेतों. कारण त्यानें मला अनेकदां बजावून सांगितलें आहे कीं, 'मित्रा द्रोणा, मी तुला विसरणार नाहीं. तूं वाटेल तेव्हां येऊन मला भेट व आपली अडचण सांग.'

द्रोण मोठ्या हुषारीनें निघाला. पांचाळराजा द्रुपद याजकडे आला; पण द्रुपदानें द्रोणाला ओळखहि दिली नाहीं. मग दूध, गाय अगर मदत कुठली? शिवाय द्रुपद असेंहि म्हणाला कीं, 'गरीब मनुष्य श्रीमंत माणसाचा किंवा राजाचा मित्र असूंच शकत नाहीं!'

द्रोण या उत्तरानें खूप रागावला. तो म्हणाला, 'असें काय? थांब कांहीं काळ. मी आपल्या शिष्यांकडून तुझा पराभव न करीन तर नांवाचा द्रोणच नव्हे!'

## ७. एकलव्य

द्रोणाचार्य कौरव आणि पांडव यांना नेमबाजीचें शिक्षण देत होते. जवळच मोठें जंगल होतें. जंगलाला लागून डोंगरांची रांग होती. त्या डोंगराच्या पायथ्याला भिल्ल लोकांची वस्ती होती. नगरांत म्हणजे शहरांत रहाणाऱ्या लोकांपेक्षां जंगलांत रहाणारे लोक शिकारींत फारच तरबेज असतात. कारण त्यांचा हरघडी जंगलांतील वाघ, सिंह, लांडगे, अस्वलें, तरस, खोकडें, माकडें, ससे, हरणें, हत्ती इत्यादि प्राण्यांशीं संबंध येत असतो.

भिल्लांप्रमाणेंच जंगलांत कोळी लोकसुद्धां रहात. जंगलांत त्यांचें एक राज्यच होतें. त्या जंगलचा राजा होता एक भिल्ल. त्या भिल्ल राजाच्या मुलाचें नांव होतें एकलव्य.

एकलव्य कौरव–पांडवांचें शिक्षण पहात असे. त्याला वाटलें आपणहि द्रोणाचार्यांजवळ शिकावें. म्हणून तो द्रोणाचार्यांकडे आला. द्रोणाचार्य म्हणाले, ‘ मला फक्त कौरव–पांडवांना शिकविण्याची परवानगी आहे, कारण माझ्या अन्नाची, माझ्या कपड्यांची; माझ्या रहाण्याची सोय भीष्म आजोबांनीं केलेली आहे. ’ हें ऐकून एकलव्य द्रोणाचार्यांच्या पायां पडला आणि त्यांनाच गुरु समजून तो एकटाच, स्वतःच नेमबाजी शिकूं लागला.

एकलव्यानें गुरु द्रोणांचा मातीचा सुंदर पुतळा तयार केला आणि तो पुतळा नेमबाजीच्या मैदानांत एका उंच सपाट दगडावर बसविला. एकलव्य त्या पुतळ्याला विचारून आणि त्यानें हुकूम दिला आहे असें मानून नेम धरी, बाण सोडी. असें करतां करतां एकलव्य अचूक संधान करूं लागला. म्हणजे एकलव्यानें ठरविलें कीं, समोरील झाडाच्या अमुक पानाच्या अगदीं मधोमध बाण गेला पाहिजे; तर अगदीं तसा, त्यानें ठरविल्याप्रमाणें बाण त्या नेमक्या पानाच्या मधून जायचा. याप्रमाणें शर म्हणजे बाण सोडण्यांत तो तयार झाल्यावर द्रोणाचार्यांना भेटावयास गेला.

एकलव्यानें गुरुजींना आपली नेमबाजी दाखविली. जवळच त्यांचा स्वतःचा पुतळा असलेला त्यांनीं पाहिला. द्रोणाचार्य एक-



लव्याचें शरसंधान पाहून खूष झाले. एकलव्यानें गुरुजींना दक्षिणा घेण्याचा आग्रह धरला. द्रोणगुरुजी नको नको म्हणत होते; तरी एकलव्य ऐकेना. मग द्रोणाचार्य म्हणाले, 'बा एकलव्या, तुझ्या उजव्या हाताचा अंगठा तोडून मला गुरुदक्षिणा म्हणून दे.'

एकलव्यानें क्षणाचाहि विचार न करतां सप्पदिशीं आपल्या उजव्या हाताचा अंगठा कापला आणि गुरूंपुढें ठेवला. धन्य तो एकलव्य ! धन्य त्याची गुरुभक्ति !

## ९. नेमबाजीची परीक्षा

द्रोणाचार्य शिक्षण देत होते आणि कौरव आणि पांडव शिकत होते. भीम आणि दुर्योधन गदायुद्धांत तरबेज झाले. शिवाय भीम कुस्तींतहि तरबेज होता. पण सर्वांना धनुर्विद्या यायलाच हवी होती. धनुष्याला बाण जोडून अचूक सांगूं तेथें बाणानें जाणें याला फार महत्त्व. धर्म, अर्जुन, नकुल, सहदेव, दुर्योधन, दुःशासन वगैरे दररोज तासन्तास शरसंधान करीत असायचे; पण सर्वांत अचूक शरसंधान अर्जुनाचें होतें. त्यामुळें त्याच्यावर द्रोणाचार्यांची फार

मर्जी बसली. इतकी मर्जी वसली कीं, अश्वत्थाम्यापेक्षां जास्त. अश्वत्थामा द्रोणांचा मुलगा; परंतु त्याच्यापेक्षां अर्जुनावर द्रोणाचार्यांचें प्रेम अधिक; कारण अर्जुन विद्येंत सरस होता.

एक दिवस भीष्म आजोबा म्हणाले, ‘आम्ही आज नातवांच्या शिक्षणाची पहाणी करणार आहोंत.’ त्याबरोबर मैदानांत राजे, सरदार, सावकार व लोक यांच्यासाठीं मोठा मंडप घातला. लोक जमले. वाजंत्रीं वाजूं लागलीं. नगारे व चौघडे झडूं लागले. शिंगाच्या आवाजांनीं कानठळ्या बसूं लागल्या. भीष्म आजोबा आले आणि नेमबाजीच्या परीक्षेला सुरुवात झाली.

द्रोणाचार्यांनीं मैदानासमोरील झाडावर एक भुश्शानें भरलेला पोपट ठेवला आणि आपल्या शिष्यांना त्याचा कंठ छेदावयास सांगितलें. सर्वांना धनुष्याला दोरी लावायला सांगितली. पवित्र्यांत उभें रहायला सांगितलें. द्रोणाचार्यांनीं आपल्या शिष्यांना विचारलें, ‘तें समोरचें झाड दिसतें ना ?’



सर्व शिष्य :– होय.

द्रोण :– त्या झाडावरील फांदीवर पोपट आहे. त्याचा कंठ बरोबर बाणानें छेदावयाचा आहे, समजलें ?

सर्व शिष्य :– होय.

मग द्रोणाचार्यांनीं धर्माला, भीमाला, दुर्योधनाला, दु:शासनाला, नकुलाला, सहदेवाला वेगवेगळें विचारलें, 'तुला काय दिसतें ?'

धर्म म्हणाला, 'मला लोक, झाड व पोपट दिसतात.'

दुर्योधन म्हणाला, 'मला तुम्ही, आजोबा, झाड, सारें दिसतें.'

दु:शासन म्हणाला, 'दादाप्रमाणेंच मला दिसतें.'

अर्जुन म्हणाला, 'मला सभा दिसत नाहीं, तुम्ही दिसत नाहीं, झाड दिसत नाहीं, फांदी दिसत नाहीं, पोपट दिसत नाहीं. दिसत आहे फक्त पोपटाचा कंठ. तुम्हीं आज्ञा देतांच तो मी छेदणारच.'

द्रोणांनीं आणि जमलेल्या लोकांनीं 'शाबास' म्हटलें.

मग सर्वांना द्रोणांनीं पोपटाचा कंठ छेदावयाची आज्ञा सोडली.

'एक, दोन, तीन...'

सर् सर् सर्–टप् टप् टप्...सर्व बाणांचा आवाज झाला. सारे बाण फुकट गेले ! फक्त एका बाणानें पोपटाचा कंठ छेदून पोपट जमिनीवर पाडला होता !

कोणाचा होता बरें तो बाण ?

अर्जुनाचाच !

साऱ्यांनीं टाळ्या वाजविल्या. अर्जुनाला शाबासकी दिली. अशी झाली परीक्षा. परीक्षेंत उतरला फक्त अर्जुन.

## १०. द्रुपदाची खोड मोडली !

कौरव–पांडवांची नेमबाजीची परीक्षा झाली. पांडव आणि कौरव यांना अचूक नेम मारतां येऊं लागले. कौरव आणि पांडव द्रोणाचार्यांना म्हणाले, 'गुरुजी, तुम्हांला हवी ती गुरुदक्षिणा मागा. आम्हीं ती देण्याचा आटोकाट प्रयत्न करूं.'

द्रोणाचार्य म्हणाले, 'पांचाल देशावर स्वारी करा आणि त्या देशाचा राजा, जो द्रुपद, त्याला बांधून माझ्यापुढें आणा.'

'ठीक आहे गुरुजी.' कौरव आणि पांडव एकदम म्हणाले.

कौरव आणि पांडव सेना घेऊन पांचाल देशाकडे निघाले. द्रोणाचार्यहि त्यांच्याबरोबर होते. कौरव-पांडवांच्या सेनेनें नगराला वेढा दिला. त्यामुळें पांचालपूरचे लोक घाबरून गेले. मोठमोठ्यानें लढाईंतील रणवाद्यें वाजतच होतीं द्रुपद राजा तावडतोब राजवाड्यांतून बाहेर आला. इकडून दुर्योधन, दुःशासन आपला पराक्रम दाखविण्यासाठीं त्याच्यावर चालून गेले. जोराची लढाई झाली. दुर्योधन-दुःशासनाचें कांहीं चालेना. कौरवांच्या ताब्यांत असलेली सेना मागें हटूं लागली. द्रुपद राजाला आनंद झाला आणि तो टाळ्या वाजवून हंसूं लागला.

कौरवसेना मागें हटते आहे हें पहातांच अर्जुन पुढें सरसावला अर्जुनाच्या मागें भीम, नकुल, सहदेव व धर्मराज हे होते. अर्जुन नेटानें लढला. द्रुपदहि जोर धरून लढत होता; पण त्याचें कांहीं चालेना व त्याला अर्जुन आटोपेना. अखेर अर्जुन धांवत गेला आणि त्यानें द्रुपदाला पकडलें.



द्रुपदाचे हात बांधले आणि त्याला द्रोणाचार्यांपुढें उभे केलें. तेव्हां द्रुपद द्रोणाचार्यांना शरण आला. तो त्यांना 'मी चुकलों !'

म्हणूं लागला. द्रोणाचार्य म्हणाले, ‘मूर्खा द्रुपदा, राजेपणाच्या गर्वानें फुगून माझा तूं अपमान केलास. भोग त्याचें फळ ! हें राज्य तुझें नसून आतां माझें आहे.’

द्रुपद हातांपायां पडत होता आणि द्रोणाचार्य रागवत होते. कांहीं वेळानें द्रोणाचार्यांचा राग शांत झाला. ते द्रुपदाला म्हणाले, ‘तूं माझा बालमित्र असल्यानें मी तुला यांतलें अर्धें राज्य देतों.’

अशी द्रुपदाची खोड मोडली. यावेळीं अर्जुनाचा पराक्रम गुरुजींच्या डोळ्यांत भरला. त्यांनीं अर्जुनाची पाठ थोपटली.

## ११. पांडवांतला अगदीं पहिला

पांडवांतला थोरला धर्म अथवा युधिष्ठिर, पण युधिष्ठिराच्या अगोदर कुंतीच्या लग्नापूर्वीं तिला एक मुलगा झाला होता. ती कथा अशी : शूर नांवाच्या राजाला पृथा नांवाची एक मुलगी झाली, ती त्यानें आपला मित्र कुंतिभोज राजा याला दान दिली, कारण कुंतिभोजाला मुलगी नव्हती. आतां कुंतिभोजाच्या या मुलीला पृथा म्हणण्याऐवजीं कुंती म्हणूं लागले.

एके दिवशीं दुर्वास मुनि कुंतिभोजाकडे आले. कुंती दुर्वास मुनींच्या अंघोळीची, पूजेची, संध्येची, फराळाची सारी व्यवस्था चोख ठेवी, त्यामुळें दुर्वास मुनि कुंतीवर प्रसन्न झाले. दुर्वास मुनि कुंतिभोजाच्या वाड्यांत चार महिने होते. एक दिवस दुर्वास मुनींनीं कुंतीला एक मंत्र शिकविला आणि ते म्हणाले. ‘या मंत्राचा जप कर. एकदांच हा मंत्र म्हण, कीं तूं बोलावशील तो देव येईल आणि तुला मुलगा देईल.’

कुंतीला आनंद झाला. त्या आनंदांतच ती झोंपीं गेली आणि सकाळीं उठून नदीवर पाणी आणण्यास निघाली. तिला सूर्याचें लालभडक बिंब दिसलें. त्याला पहात पहात ती नदीकांठीं आली आणि तिनें दुर्वास मुनींनीं शिकवलेला मंत्र म्हटला.

त्याबरोबर प्रत्यक्ष सूर्यनारायण तिच्यापुढं उभा राहिला. सूर्यानें तिला कवचकुंडलांसुद्धां एक गोजिरवाणा मुलगा दिला आणि तो निघून गेला. हें सगळें इतक्या थोडक्या वेळांत झालें कीं, कुंती

घाबरूनच गेली. नदींत एक रिकामें होडगें नांगरून ठेवलेलें होतें. त्या होडग्यांत तिनें सूर्यानें दिलेलें बाळ ठेवलें व होडग्याचा दोर नांगरापासून सुटा करून ती नदीवरून पाणी घेऊन घरीं गेली.



इकडें होडगें डुलत डुलत चाललें होतें. तें अधिरथ सारथ्यानें अडवलें. होडग्यांतला मुलगा घेतला आणि आपल्या राधा नांवाच्या बायकोजवळ दिला. राधेला मूलबाळ कांहींच नव्हतें. तिनें प्रेमानें मुलाला वाढविलें. मुलाच्या हातावर ‘कर्ण’ असा शब्द दिसला म्हणून त्या मुलला ‘कर्ण’ असें म्हणूं लागले.

• कर्ण मोठा झाला आणि कौरवांत मिसळला. दुर्योधनाची व त्याची दोस्ती जमली. तो कौरवांच्या बाजूचा झाला आणि पांडवांचा राग करूं लागला. वास्तविक तो पांडवांत सर्वांत थोरला होता; पण हें कौरव अगर पांडवांना माहीत नव्हतें.

## १२. पांडव हवा पालटतात

कौरव–पांडवांचें शिक्षण झालें. त्यांना लढाया जिंकतां येऊं लागल्या. तेव्हां त्यांच्यांत थोरला जो युधिष्ठिर अथवा धर्म त्याला धृतराष्ट्रानें युवराज नेमलें. झालें, दुर्योधन, दु:शासन, शकुनि, कर्ण

हे रागावले. कारण उघड होतें. आज धर्म युवराज झाला म्हणजे धृतराष्ट्रानंतर तोच राजा होणार ! आणि हें तर कौरवांना नको होतें.

कौरवांचा मामा शकुनि यानें एक युक्ति काढली. तो म्हणाला, ‘पांडवांना कांहीं दिवस वारणावती नगराला हवा पालटण्यास पाठवा.’ धृतराष्ट्रानें हो म्हटलें. पांडव कुंतीसह रथांत बसून वारणावतीला निघाले.

निघण्यापूर्वी पांडव विदुराच्या भेटीला आले. विदुराला शकुनीचा दुष्ट स्वभाव माहीत होता. विदुरकाकांनीं एक माणूस आधीं वारणावतीला पाठविला होता.

कौरवांनीं आपला माणूस पांडवांसाठीं घर बांधण्याला पाठविला होता.

घर बांधणाराचें नांव होतें विरोचन. विरोचनानें लाख, राळ, कापूर मातींत मिसळून त्यांच्या विटा बनवून घर बांधलें.

लाख, राळ व कापूर हे पदार्थ लवकर पेटतात. विदुराच्या माणसानें त्या घरांतून दूर अरण्यांत जातां येईल असें विवर खणलें.

कौरवांना या विवराचा म्हणजे भोंकाचा पत्ता नव्हता. पांडवसुद्धां आपणांला कांहींच माहीत नाहीं असें दाखवीत होते.


वारणावतीला निघतांना ते धृतराष्ट्र, गांधारी, भीष्म व विदुर या वडिलांच्या पायां पडले.

कौरव आणि पांडव यांनीं एकमेकांना मिठ्या मारल्या. दुष्ट शकुनि तोंड बाजूला करून हंसत होता.

पांडव वारणावतीला पोहोंचले. कुंतीसुद्धां ते सारे विरोचनानें बांधलेल्या ‘लाखेच्या घरांत’ राहूं लागले.

वारणावतीला मोठी जत्रा भरली होती. हजारों लोक यात्रेसाठीं आले होते. यात्रेकरूंपैकीं एक बाई व तिचीं पांच मुलें रात्रीच्या वेळीं पांडवांच्या ‘लाखेच्या घरांत’ मुक्कामाला होतीं.

यात्रेच्या गडबडीची रात्रीची वेळ बघून कौरवांच्या सेवकांनीं घराला आग लावली !



घर धडधडां पेटूं लागलें. कारण भिंतींतल्या विटांत कापूर, लाख, राळ असले पदार्थ होते. त्यामुळें लांकडेंहि पेटलीं आणि सारें घर जळून गेलें. आग कांहीं विझवतां आली नाहीं.

उजाडल्यावर घराची राख झालेली! त्या राखेंत एका स्त्रीचें आणि पांच पुरुषांचीं प्रेतें सांपडलीं.

लोक हळहळूं लागले. पांडव कुंतीसह जळाले ही वार्ता हस्तिनापूर येथें कौरवांना कळाली. कौरव हळहळूं लागले. मनापासून कीं वरवर?

शकुनिमामाला तर आनंदाच्या उकळ्या फुटल्या.

पण पांडव आग लागतांच विवरावाटें दूर अरण्यांत निघून गेले हें कौरवांना कुठें माहीत होतें?

पांडव व कुंती सुखरूप असल्याचें फक्त विदुरालाच माहीत होतें.


## १३. हिंडिब आणि हिंडिबा

पांडव लाखेच्या घरांतील विवरांतून बराच वेळ चालले. अगदीं थकून गेले. एवढ्यांत विवराचें तोंड आलें. पहातात तर घनदाट

अरण्य ! रात्र काळोखी ! कुंतीला तर एक पाऊलहि टाकवेना; तेव्हां भीमानें तिला आपल्या खांद्यावर घेतलें, नकुलाला आणि सहदेवाला कडेवर बसविलें आणि धर्म आणि अर्जुनाचे हात धरले. भीम दक्षिण दिशेकडे चालत राहिला. एवढ्यांत कुंतीला लागली तहान. तेव्हां साऱ्या जणांना झाडाखालीं बसवून भीम पाणी आणण्यास निघाला.

एके ठिकाणीं भीमाला पाणी आढळलें. त्या पाण्यांत त्यानें आपल्या अंगावरील उपरणें बुचकळलें व तो परत झाडाखालीं आला. पहातो तों सर्वांना झोंप लागली आहे, मग भीम पहारा करूं लागला

जवळच एक माणूसखाऊ राक्षस होता. हिडिंब त्याचें नांव. त्याला एक सुंदर बहीण होती, तिचें नांव हिडिंबा. ती माणसांना खात नव्हती. हिडिंबाला माणसाचा वास येतांच त्यानें हिडिंबेला शोधासाठीं पिटाळलें.



हिडिंबेला झोंपलेलीं माणसें दिसलीं आणि पहारा करणारा भीम दिसला. भीमाचें बळकट, दणकट व सुंदर शरीर पाहून ती भावाला निरोप सांगायचें विसरून भीमाशींच गोष्टी करीत राहिली.

हिडिंबा अजून कां येत नाहीं म्हणून हिडिंब रागावून चवताळून तिच्या शोधास आला; तर ती एका माणसाशीं गोड गोड बोलत बसलेली त्याला दिसली.

यामुळें तो आणखीं रागावला व भीमावर धांवून गेला, पण भीम फारच बलशाली होता. त्याला कुस्तीचे डाव माहीत होते. भीमानें एका घडींत हिडिंबाची मान मुरगाळून टाकली.

यामुळें अर्जुन, धर्म, नकुल, सहदेव व कुंती हे सारे जागे झाले.

हिडिंबा कुंतीच्या पायां पडली. मला भीमाशीं लग्न करायची परवानगी द्या म्हणाली. धर्मानें व कुंतीनें एक वर्षापुरतें भीमाशीं हिडिंबेचें लग्न करण्याची परवानगी दिली.

भीम आणि हिडिंबा यांना एक मुलगा झाला. त्याचें नांव घटोत्कच. हा आपल्या बापासारखा फार पराक्रमी होता.

## १४. बकासुर

अरण्यांतलें वर्ष संपलें आणि पांडव एकचक्रा नगरींत आले. तेथें ब्राह्मण वेषानें राहूं लागले आणि दहा घरीं माधुकरी मागून आपलें पोट भरूं लागले.

ते एका ब्राह्मणाच्या घराच्या पडवींत रहात होते. या ब्राह्मणाच्या घरांतून रडण्याचा आवाज ऐकूं आला, म्हणून भीम म्हणाला, ‘ पहा ना आई, ब्राह्मणाच्या घरांत कां रडारड चालली आहे तें ?’

कुंती त्या ब्राह्मणाच्या घरांत गेली, तेव्हां बायको ब्राह्मणाला म्हणते कीं, ‘ तुम्ही नका बळी जाऊं; मी जातें. कारण माझ्यानंतर तुम्ही मुलाबाळांचा सांभाळ कराल. तुम्ही जर बळी गेलांत तर मुलेंबाळें उपाशीं मरतील. ’

ब्राह्मण म्हणत होता, ‘ मीच बळी जातों, कारण मुलाबाळांना वाढवणें मला जमणार नाहीं. ’

हें सारें बोलणें थांबवून कुंतीनें चौकशी केली, तेव्हां तिला समजलें कीं, जवळच्या अरण्यांत बक नांवाचा राक्षस असून त्यानें या एकचक्रा नगरीवर एक भयंकर कर बसविला आहे.

त्याला रोज गाडाभर अन्न, दोन रेडे व एक माणूस खावयास पाहिजे. नाहींतर तो या नगरींतले सारे लोक एका दिवशीं ठार करील. कुंतीनें हें सारें ऐकून घेतलें. मग कुंती म्हणाली, 'तुम्ही कोणीच बळी जाऊं नका, माझा मुलगा बळी जाईल.'

ब्राह्मण व त्याची बायको नको नको म्हणत होतीं, पण पांडवांनीं त्यांचें ऐकलें नाहीं.

लगेच भीम स्वत: अन्नाच्या गाड्यावर बसला व रेडे हांकीत हांकीत तो बकाच्या घराकडे गेला. घरासमोरच त्यानें गाडा सोडला व रेडे रानांत पिटाळून दिले आणि मग गाड्यांतील अन्न खाऊं लागला.

आज गाडा येण्याला आधींच उशीर झाला होता आणि शिवाय हा मनुष्य भिऊन निपचित न पडतां खुशाल अन्न खातो आहे याचें बक राक्षसाला नवल वाटलें. पण भुकेमुळें आणि भीमाच्या धिटाईमुळें तो रागावला आणि मोठ्यानें ओरडूं लागला.



बक म्हणाला, 'मूर्खा, माझें अन्न खाणारा तूं कोण ? आणि रेडे कोठें आहेत ?'

भीमाचें एक नाहीं कीं दोन नाहीं. त्यानें अन्न खाण्याचा सपाटा सुरूच ठेवला. मग राक्षस धांवत आला आणि भीमाला बुकलूं लागला. भीम म्हणाला, 'खासें अंग रगडून निघत आहे. जेवण झाल्यावर घेतोंच तुझा समाचार!'

जेवण झाल्यावर भीमाची व बक राक्षसाची झोंबाझोंबी सुरू झाली. भीमानें बकाच्या शरीराच्या चिरफाळचा उडवल्या; तेव्हां तो 'ओय ओय!' ओरडून रक्त ओकून मरण पावला.

अशा रीतीनें भीमानें त्या ब्राह्मणावरचें व एकचक्रा नगरीवरचें संकट कायमचें नाहींसें केलें.

## १५. द्रौपदी


एकचक्रा नगरींतून दुसरीकडे जावयास पांडव निघाले. निघण्याचें कारण, त्यांना द्रुपद राजाची मुलगी द्रौपदी स्वयंवर करते आहे असें समजलें. पांडव ब्राह्मण वेषानें निघाले आणि पांचाल नगरींत एका कुंभाराच्या ओटीवर मुक्कामास राहिले. स्वयंवरासाठीं द्रुपद राजानें मोठा मंडप घातला होता. मंडपाच्या मध्यभागीं पेटत्या चुलीवर एक मोठी उकळत्या तेलाची कढई होती. कढईच्या वर छतापाशीं एक मासा गरगर फिरत राहील अशी योजना केलेली होती. कढईंतील उकळत्या तेलांत मासा पाहून त्या गरगर फिरणाऱ्या माशाचा डावा डोळा जो बाणानें फोडील त्याला द्रौपदी माळ घालणार होती.

पण मोठा अवघड होता. स्वयंवरासाठीं दुर्योधन, दुःशासन, शकुनि, कर्ण वगैरे कौरवांकडील लोक आले होते. देशोदेशींचे राजे आले होते राजे लोकांची बसायची जागा वेगळी होती आणि ब्राह्मण लोकांची बसायची जागा वेगळी होती. त्यामुळें आणि पांडवांनीं ब्राह्मणवेष धारण केल्यानें ते कोणाला ओळखूं आले नाहींत. शिवाय ते लाखेच्या घरांत जळून मेले अशी सर्वांची समजूत होती.

द्रौपदीचा पण अवघड असल्यानें कोणीच राजा किंवा राजपुत्र माशाचा डोळा फोडायला पुढें येईना. कर्ण आला तेव्हां द्रौपदी म्हणाली, 'मी हलक्या कुळांतील तरुणाशीं लग्न करणार नाहीं.'

तेव्हां कर्ण हिरमुसला होऊन दुर्योधनाजवळ बसला. कोणीच पण जिंकण्यास येईना; तेव्हां द्रुपद म्हणाला, 'या पृथ्वीच्या पाठीवर एकसुद्धां असा वीरपुरुष नाहीं का ?'

द्रुपदाचे हे रागाचे शब्द ऐकून ब्राह्मणमंडळींतून अर्जुन उठला. ताठ मान करून व छाती पुढें करून तो कढईजवळ गेला. त्यानें हातांत धनुष्यबाण घेतले व तेलांत पाहून छतावरील माशाचा डावा डोळा बरोबर उडवला.



द्रौपदीला आनंद झाला. तिनें अर्जुनाच्या गळयांत माळ घातली. त्यावरोबर राजे लोकांत गडबड उडाली; पण भीम व अर्जुन यांनीं सगळयांना चोपून काढलें.

इतक्यांत व्यास तेथें आले. त्यांनीं द्रौपदीनें पांचहि पांडवां-बरोबर विवाह करावा असें सांगितलें. कारण द्रौपदीनें पूर्वीच्या

जन्मांत शंकराजवळ पति मागितला; पण पांच वेळां मागितला. म्हणून या जन्मांत द्रौपदीनें पांचहि पांडवांशीं लग्न केलें.

## १६. धर्म राजा झाला

द्रुपद राजाची मुलगी पांडवांना मिळाली, यामुळें दुर्योधन, दु:शासन या कौरवांचा तडफडाट झाला. शकुनीमामा रागावला; कर्णालाहि फार वाईट वाटलें.

शकुनि म्हणाला, 'आपण वारणावतीला लाखेच्या घरांत पांडवांना जाळलें; पण हे जिवंत राहिले कसे? हे आतां राज्याची वांटणी मागणारच!' धृतराष्ट्र विचार करूं लागला. विदुरानें धृतराष्ट्राला सांगितलें, 'राजा धृतराष्ट्रा, तूं पांडवांना बोलावून घे आणि त्यांना अर्धें राज्य दे.'

दुर्योधन व दु:शासन बापाला म्हणाले, 'कशाला बोलावतां पांडवांना?'

धृतराष्ट्र म्हणाला, 'न बोलावून चालणार नाहीं. तुला कसें काय वाटतें विदुरा?'

विदुर म्हणाला, 'पांडवांना राज्याची वांटणी दिली कीं भांडणाचें मूळच नाहींसें होईल.'

विदुराचें बोलणें आंधळ्या धृतराष्ट्राला पटलें. त्यानें पांडवांना आणण्यासाठीं पांचाळपुराला आपले सेवक पाठविले. सेवक पांचाळपुराला आले. धृतराष्ट्राचा निरोप ऐकून पांडवांना आणि द्रुपदाला नवल वाटलें.


द्रुपदानें सर्वांना चांगलें जेवण दिलें, पोषाख दिले आणि पांडवांना मोठ्या थाटानें निरोप दिला.

पांडव हस्तिनापुराबाहेर येतांच त्यांना वाजत-गाजत, मिरवणूक काढून राजवाड्यांत नेलें. रस्त्यावर, माड्यांवर, गच्च्यांवर गर्दी झाली होती. मुलें आणि स्त्रिया, तरुण, पुरुष आणि म्हातारीं

माणसें पांडवांना आणि द्रौपदीला पहाण्यासाठीं रेटारेटी करीत होतीं.

मिरवणूक राजवाड्यापाशीं येऊन थांबतांच स्त्रियांनीं पंचारती घेऊन पांडवांना आणि द्रौपदीला ओवाळलें. कुंतीला, विदुराला आणि म्हाताऱ्यांना हें पाहून आनंदाचें भरतें आलें. त्यांच्या डोळ्यांवाटे आनंदाचे अश्रु ओघळूं लागले.

धृतराष्ट्रानें पांडवांना प्रेमानें कुरवाळलें. कुंती, द्रौपदीचें कोड-कौतुक होत होतें.



नंतर धृतराष्ट्रानें विदुराचा विचार घेऊन पांडवांना अर्धें राज्य दिलें. पांडवांनीं इंद्रप्रस्थ आपली राजधानी केली.

धर्माला राज्याचा अभिषेक केला. धर्माची हत्तीवरून मिरवणूक निघाली. लोक अर्जुन, भीम, नकुल आणि सहदेव यांच्यावर सोन्याचीं फुलें उधळीत होते. धर्मानें सगळ्यांना दागिने आणि कपडे दिले. लोकांना संतोष झाला. अशा रीतीनें धर्म राजा झाला.

# १७. सुभद्रेला पळविलें


द्वारकानगरी. द्वारकेला बलराम राजा होता. बलरामाचा धाकटा भाऊ कृष्ण व कृष्णाची धाकटी बहीण सुभद्रा. कुंती ही बलराम, कृष्ण व सुभद्रा यांची आत्या. म्हणून पांडव हे त्यांचे आतेभाऊ.

पांडवांपैकीं अर्जुन तीर्थें पहात पहात द्वारकेला आला. कृष्णाची आणि अर्जुनाची फार मैत्री होती. यामुळें फक्त कृष्णानें अर्जुनाला ओळखलें. बलरामानें अर्जुनाला ओळखलें नाहीं, कारण अर्जुनाच्या अंगावर प्रवास करीत असल्यामुळें मलिन झालेलीं वस्त्रें होतीं.

त्याच सुमारास द्वारकेजवळील रैवतक नांवाच्या पर्वतावर देवीची यात्रा होती. देवीच्या दर्शनासाठीं रोज हजारों लोक जात व येत; पण बलरामाचें लक्ष कांहीं यात्रेकडे नव्हतें. त्याला आपल्या बहिणीच्या लग्नाची काळजी होती. हस्तिनापूरचा राजपुत्र दुर्योधन याला सुभद्रा द्यावी असें त्याला वाटत होतें; पण हा विचार सुभद्रेला पटत नव्हता. तिला 'अर्जुनाशीं' आपलें लग्न व्हावें असें वाटत होतें. कृष्णाचीहि तशीच इच्छा होती; पण दादापुढें बोलणार कोण ? बलरामदादा तर फार रागीट असल्यानें त्यांच्यासमोर बोलण्यास सुभद्रा फार भीत असे आणि कृष्णसुद्धां बलरामाशीं अगदीं थोडें बोले. बलराम रागीट होता; पण राग गेल्यावर फार प्रेमळहि होता. तो प्रेमांत आला म्हणजे कृष्ण त्याला त्याची चूक दाखवून देई व तोहि कृष्णाच्या शहाणपणाची तारीफ करी.

बलरामदादानें दुर्योधनाशीं सुभद्रेचें लग्न करण्याचें ठरविलें आणि मग तो सारी मंडळी घेऊन रैवतक पर्वतावर देवीच्या दर्शनास निघाला. सगळ्या मंडळींनीं देवीचें दर्शन घेतलें आणि त्या यात्रेच्या गडबडींत अर्जुनानें सुभद्रेला पळविलें !

बलरामदादा फार रागावला. 'कोण्या यात्रेकरूनें, भिकारड्यानें माझी बहीण पळविली ? घेतों त्याचा समाचार !' असें दादा



ओरडूं लागला. कृष्णालाहि तो रागें भरला. 'तुझें कशांत लक्षच नाहीं!' कृष्ण खालीं मान घालून चालला. अर्जुनाचा रथ कांहीं बलरामाच्या टापूंत येईना; तेव्हां कोठें त्याच्या लक्षांत आलें कीं, इतक्या वेगानें रथ नेणारा अर्जुन असला पाहिजे. मग त्याचा राग जरा शांत झाला. बलराम म्हणाला, 'कांहीं हरकत नाहीं. दुर्योधनाच्या बरोबरीच्या मानाचा अर्जुन आहे, नाहीं का कृष्णा ?'

कृष्ण म्हणाला, 'मी तरी तेंच म्हणतों!'

मग बलरामाचा राग शांत होऊन त्यानें मोठ्या थाटानें अर्जुन व सुभद्रा यांचें लग्न लावलें.

## १८ खेळामुळें पांडवांना त्रास

पांडव इंद्रप्रस्थाला राज्य करीत होते आणि कौरव हस्तिनापुराला राज्य करीत होते. पांडवांबद्दल लोक चांगलें बोलत तसें कौरवांबद्दल बोलत नसत. पांडवांचा लढाईंत पराभव करणें कौरवांना कठीण होतें. तेव्हां शकुनीमामानें एक युक्ति काढली. त्यानें दुर्योधनाला सुचविलें कीं, 'पांडवांना सोंगट्यांचा खेळ खेळा-

वयास बोलाव; पण ते कांहींतरी कारण सांगून येणार नाहींत. तुझ्या वडिलांना सांग, म्हणजे तुझे वडील धृतराष्ट्र पांडवांना आणतील.'

दुर्योधनानें धृतराष्ट्राला सांगितलें. धृतराष्ट्रानें विदुराला इंद्रप्रस्थाला पाठविलें. धृतराष्ट्राच्या निरोपामुळें पांडव हस्तिनापुराला आले. धृतराष्ट्र म्हणाला, 'बाळांनो, तुम्हांला सहज बोलाविलें. चार-आठ दिवस रहा. चांगलेंचुंगलें भोजन करा. खेळा, आराम करा आणि मग परत इंद्रप्रस्थाला जा.' पांडव म्हणाले, 'आज्ञा महाराज.' एक दिवस चांगलें जेवण झाल्यावर दुर्योधन म्हणाला, 'फार आळस आला बुवा, आपण फाशांचा डाव खेळूं.' शकुनि म्हणाला, 'नुसता नको, कांहींतरी पैज लावूं' धर्म म्हणाला, 'फासे खेळणें चांगलें नव्हे आणि पण लावून खेळणें तर फारच वाईट!' या बोलण्यावर धर्मराजाची कौरवांनीं टिंगल केली, त्यामुळें तो पट किंवा सोंगट्या खेळण्यास बसला. खेळतांना फांसे टाकावे लागतात. फांसे लांबट चौकोनी व भरीव असतात. • • •

एका बाजूला पांची पांडव आणि दुसऱ्या बाजूला दुर्योधन, दु:शासन, शकुनि, कर्ण आणि दुर्योधनाचे भाऊ असे खेळूं लागले. पहिला डाव कौरवांचा होता. शकुनि फांसे टाकण्याअगोदर म्हणाला, 'बोला. कांहीं पण लावा, कांहीं पैज?'

पांडवांतर्फे धर्म म्हणाला, 'फासे जर बरोबर पडले नाहींत तर मी आपलें राज्य कौरवांना देईन, फांसे माझ्या बाजूनें पडले तर...'

दुर्योधन म्हणाला, 'आमचें राज्य तुला मिळेल. हस्तिनापूरची गादी तुझी होईल.' शकुनीमामानें फांसे खुळखुळून दान टाकलें. अरेरे! तें दान किंवा तो डाव पांडवांच्या विरुद्ध पडला.! झालें. पहिल्याच डावांत पांडव इंद्रप्रस्थाचें राज्य गमावून बसले! धर्मराजा डावामागून डाव हरतच चालला. कारण शकुनि हा लबाडीनें फांसे टाकीत होता. अखेर फांसे पाहणाऱ्या लोकांनीं हे डाव धरूं दिले नाहींत, त्यामुळें भीष्म, द्रोण, विदुर यांच्यावर दुर्योधन फार रागावला!



वयास बोलाविलें.
म्हणून पुन: धर्म
ाऊ होतेच; पण

बारा वर्षें वनवास
ळखू न येईल असें
ावीं, असा तो पण
ी कपडे व दागिने
निघाले ! पहा,
ला तो !

नांत असतांनाहि
ाटसरू वगैरे येत
िवण मिळत असे.
म भोजन दिलें'

पण पुन्हां धर्मराजाला दुर्योधनानें फांसे खेळा
फांसे खेळावयास न गेलों तर भित्रा म्हणतील,
फांसे खेळावयास गेला. बरोबर त्याचे चारहि भ
याहि वेळीं धर्म हरत गेला.

डाव हरल्यामुळें पांची पांडव व द्रौपदी यांनीं
भोगावा असें ठरलें. तेराव्या वर्षीं कोणालाच ओ
रहावें; नाहींतर पुन: बारा वर्षें वनवासांत काढ
होता. त्याप्रमाणें पांडव व द्रौपदी अंगावरील भा
काढून ठेवून भणंग भिकाऱ्याप्रमाणें वनवासाला
पैज लावून सोंगट्या खेळण्यानें केवढा अनर्थ झाल

## १९. दुर्वास व थाळी

पांडव वनवासांत दिवस काढीत होते. व
त्यांच्याकडे ऋषि, मुनि, राजे, सरदार, उतारू, व
असत आणि त्यांना पांडवांकडे समाधानकारक जे
'आपला पांडवांनीं चांगला आदर केला, उत्त

असें कोणी दुर्योधनाला सांगितलें कीं तो चरफडायचा ! दुर्योधन म्हणे, 'मूर्खांना वनवासाला लावलें, तरी तेथें मोठेपणा गाजवतात काय ?'

सूर्यनारायणाच्या कृपेनें पांडवांना एक थाळी मिळालेली होती. आणि तिच्यांतलें अन्न द्रौपदीचें जेवण झाल्याशिवाय कमी होत नसे. द्रौपदीचें जेवण होऊन थाळी विसळून तिनें ती पालथी घातली कीं अन्न संपत असे. ही गोष्ट दुर्योधनाला माहीत झाली. पांडवांची फजिती करण्यासाठीं त्यानें दुर्वास मुनींनाच अपरात्रीं पांडवांकडे पाठविलें. त्याचें असें झालें–

एकदां फिरत फिरत दुर्वास कौरवांकडे गेले. कौरवांनीं त्यांची सेवा केली. दुर्वास दुर्योधनाला म्हणाले, 'वर माग !' दुष्ट दुर्योधन म्हणाला, 'ऋषिवर्य, आपण भलत्याच वेळीं रात्रींला जाऊन पांडवांकडे जेवण मागा.'

त्याप्रमाणें पांडव ज्या वनांत होते, तेथें अपरात्रीं दुर्वास मुनि आपल्या शेंकडों शिष्यांसुद्धां आले. धर्मानें त्यांना 'या बसा' म्हटलें. दुर्वास म्हणाले, 'धर्मा, आम्ही अंघोळी करून येत आहोंत, तोंवर जेवणाची तयारी कर.' धर्म, त्याचे भाऊ आणि द्रौपदी काळजींत पडलीं. कारण सर्वांचीं जेवणें होऊन द्रौपदीनें जेवण करून थाळी धुऊन पालथी टाकली होती ! आतां भलत्या वेळीं या शेंकडों मुनींना जेवावयास कसें घालावयाचें याची द्रौपदीला चिंता पडली.

द्रौपदीनें कृष्णाची आठवण काढली. अगदीं मनापासून श्रीकृष्णाची आळवणी केली. त्याबरोबर श्रीकृष्ण तेथें आले ! पण श्रीकृष्णाला फार भूक लागली होती. श्रीकृष्ण म्हणाला, 'मला, फार भूक लागली आहे.' द्रौपदी म्हणाली, 'घरांत कांहीं नाहीं.' श्रीकृष्ण म्हणाला, 'बघ, बघ तुझी थाळी !' द्रौपदीला थाळींत कांहीं दिसेना ! फारच बारकाईनें पाहिल्यावर एक भाजीचें पान दिसलें तेंच कृष्णानें खाऊन ढेकर दिला. कृष्ण संतुष्ट झाला आणि त्यानें उत्तम पक्वान्नांचे ढीग तेथें उत्पन्न केले. त्या सुवासिक अन्नाचा वास (दरवळ) नदीवर ऋषि अंघोळ करीत होते, तेथवर गेला. त्या अन्नाच्या वासानेंच ऋषींचीं पोटें भरलीं. दुर्वास आणि त्यांचे



शिष्य यांना अन्नाचे ढेकर येऊं लागले. धर्मानें, भीमानें, अर्जुनानें नकुलानें, सहदेवानें त्यांना ' जेवण तयार आहे, चलावें महाराज ! ' अशी वारंवार विनंति केली; पण भूकच गेल्यानें ते उलट म्हणूं लागले, ' आम्हांला जेवण पावलें. आम्हीं दुर्योधनाच्या सांगण्यावरून तुमचें सत्व घ्यायला आलों; पण आम्हीच हरलों. पांडवांनो, देव श्रीकृष्ण तुमचा पाठीराखा आहे ! तो तुम्हांला कांहीं कमी पडूं देणार नाहीं; हाच आमचा आशीर्वाद ! '

पहा ! दुर्वास सत्व घ्यायला आले व फजित होऊन परत गेले.

## २० दुर्योधनाचें खोटेंपण आणि धर्माचें मोठेंपण

पांडव द्वैत नांवाच्या वनांत वनवासाचे दिवस काढीत होते. त्याच वनांत कौरवांची खिल्लारें होतीं. हजारों गाई होत्या. वासरें होतीं, बैल होते. दूधदुभत्याची व्यवस्था पहाणारे गवळी होते. त्या गवळयांचे गौळीवाडे होते.

तेव्हां गौळीवाडयांची व्यवस्था पहाण्याच्या मिषानें द्वैतवनांत जावें आणि आपलें वैभव दाखवून पांडवांना लाजवावें असा दुर्यो-

धनानें विचार केला. शकुनिमामा, कर्ण, दु:शासन वगैरेंनां या विचारानें आनंद झाला.

दास-दासी, हत्ती, घोडे, रथ, पायदळ आणि मेजवानीचे पदार्थ घेऊन कौरव द्वैत वनाकडे यायला निघाले. हंसत खेळत नि पांडवांची निंदा करीत ते चालले होते. बायकामुलेंहि बरोबर होतीं.

द्वैतवनाकडे येतांना वाटेंत त्यांना एक सरोवर लागलें. त्या सरोवरावर गंधर्वांच्या सेवकांचा पहारा होता. गंधर्वांचे सेवक कांहीं कौरवांना त्या तळ्याकडे येऊं देईनात. ते म्हणाले, 'चित्ररथ गंधर्व आपल्या बायकामुलांसह इथें पाण्यांत खेळत आहेत आणि त्यांचा कोणालाहि येऊं न देण्याचा हुकूम आहे.'

असें ऐकतांच दुर्योधन चिडला. 'माझ्यासारख्या हस्तिनापूरच्या राजपुत्राला सरोवराकडे येऊं न देणारा हा कोण?' म्हणून त्यानें गंधर्वाच्या सेवकांशीं मारामारी केली. गंधर्वाचे सेवक ऐकेनात म्हणून कौरवांची आणि गंधर्वांची लढाई झाली. त्यांत कौरवांचा पराभव झाला.

गंधर्वानें दुर्योधन-दु:शासन यांना कैद केलें. कौरवांचे सैनिक इकडे तिकडे लपण्यासाठीं पळत सुटले. त्या पळपुट्या सैनिकांकडून धर्माला गंधर्व व कौरव यांच्या लढाईची हकीकत समजली. धर्माचे भाऊ जवळच बसलेले होते.

भीम म्हणाला, 'खोटेपणानें वागणाऱ्याला बरी अद्दल घडली!'

अर्जुन म्हणाला, 'कपटानें फांसे खेळून आमचें राज्य घेतो, नाहीं का? भोग आतां त्याचीं फळें!'

नकुल आणि सहदेवहि, 'बरें झालें. ठीक झालें!' असें म्हणाले. पण धर्माला आपल्या भावांचें बोलणें पटलें नाहीं. तो म्हणाला, 'आपण आपसांत भांडतांना पांडव पांच व कौरव शंभर असे आहोंत; पण तिसरा कोणी आपणांवर चालून आला, तर कौरव आणि पांडव मिळून आपण एकशेंपांच आहोंत हें विसरूं नका.'

धर्म आणखीं पुढें म्हणाला, 'भीमा-अर्जुना, आपला राग आंवरा आणि कौरवांना गंधर्वांच्या हातून सोडवा. नकुला, सहदेवा, तुम्हींहि मदतीला जा.'



त्याबरोबर चारहि पांडव गंधर्वांवर चालून गेले आणि त्यांनीं कौरवांची सुटका केली व त्यांना धर्मापुढें उभें केलें.

तेव्हां धर्म म्हणाला, ' सुयोधना, (धर्म दुर्योधनाला सुयोधन म्हणत असे.) संकटाच्या वेळीं एकमेकांना मदत करणें हें आपलें कर्तव्यच आहे. तेवढेंच आम्हीं बजाविलें. '

कौरव मान खालीं घालून मनांत म्हणत होते, ' आम्ही आलों पांडवांचीं फजिती करण्यास, पण आमची फजिती केली पांडवांनीं ! '

## २१. कर्णासारखा दाता नाहीं

कर्ण सारथ्याच्या घरीं लहानाचा मोठा झाला. कौरवांचा तो सोबती होता. दुर्योधनानें त्याला अंग देश दिला. कर्ण अंग देशाचा राजा झाला असा हा कर्ण फार उदार होता. मोठा दाता होता, म्हणजे दान देणारा होता. कोणी त्याच्याजवळची कोणतीहि वस्तु मागो; कर्ण ती वस्तु तावडतोब त्या मागणाऱ्याला देई. असा तो मोठा दानशूर होता.

अशा या दानशूर कर्णाच्या अंगावर जन्मापासून कवच होतें. या कवचामुळें त्याला बाण लागत नसत अगर जखमहि होत नसे.

जसा नाजुक किड्याच्या बाहेर शिपला असतो, त्याप्रमाणें कर्णाच्या शरीराबाहेर कवच होतें.

अर्जुन आणि कर्ण एकमेकांविरुद्ध लढणार हें नक्की होतें. तेव्हां अर्जुनाची पडली इंद्राला काळजी. कारण इंद्राच्या कृपेनें कुंतीला अर्जुन झाला होता आणि कर्णाची पडली सूर्याला काळजी. कारण सूर्याच्या कृपेनें कुंतीला कर्ण झाला होता.

एक दिवस कर्ण झोपेंत असतांनाच त्याच्याकडे सूर्यदेव आला आणि तो सांगूं लागला, 'तुझ्याकडे आज ब्राह्मणाचें रूप घेऊन इंद्र येईल आणि कवचकुंडलाचें दान मागेल, पण तीं तूं देऊं नकोस. जर देशील तर तुझ्या शरीराला बाण लागून तूं मरशील.'

कर्ण म्हणाला, 'देवा, तुम्हीं मला चांगली सूचना दिलीत; पण दान मागणाराला नाहीं म्हणायचें नाहीं हा माझा स्वभाव आहे, त्याला माझा नाइलाज आहे!'



कर्णाच्या या उत्तरानें सूर्यदेव खिन्न होऊन परत गेला.

सकाळ झाली. कर्ण आसनावर बसला होता, इतक्यांत एक ब्राह्मण आला आणि तो त्याच्याजवळ कवच-कुंडलांचें दान मागूं

लागला. क्षणभर–अगदीं क्षणभर कर्णाला सूर्यदेवानें दिलेली सूचना आठवली; पण त्याचें दानशूर मन स्वस्थ बसेना. कर्ण म्हणाला, 'ब्राह्मणमहाराज, आज आपण मजकडे आल्यानें मला आनंद झाला आहे. आपल्या इच्छेप्रमाणें हें कवच आणि हीं कुंडलें आपणांस दान दिलीं आहेत.'

कवच–कुंडलें मिळतांच ब्राह्मणानें आपलें रूप बदललें. ब्राह्मण आपल्या रूपांत दिसूं लागला. तो होता इंद्रदेव. इंद्रदेव म्हणाला, 'कर्णा, तुझ्या या उदार दानामुळें मी तुजवर खूष झालों आहें. म्हणून तुला मजजवळील महाशक्तीचा मंत्र देतों.'

मग इंद्रानें कर्णाला महाशक्तीचा मंत्र दिला आणि तो इंद्रलोकांत निघून गेला.

आपल्या अंगावरचें कवच आणि कानांतील कुंडलें दान दिल्याचें कर्णाला थोडेंदेखील वाईट वाटलें नाहीं. कर्ण मुळींच हळहळला नाहीं. कारण जो जें मागेल तें त्याला द्यायचें हाच तर मुळीं त्याचा स्वभाव होता. कर्णासारखा दाता पुन्हां व्हायचा नाहीं.

## २२. विराटाच्या राज्यांत

पांडवांचा बारा वर्षें वनवास पुरा झाला. पांडवांनीं बारा वर्षें वनवास भोगला. आतां एक वर्ष अज्ञातवासांत काढायचें उरलें. अज्ञातवासांत रहायचें म्हणजे कोणींहि हे पांडव आहेत असें ओळखतां कामा नये. या अज्ञातवासाच्या वर्षांत त्यांना कौरवांनीं ओळखलें; तर पुन्हां बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास काढावा लागणार होता. यासाठीं पांची पांडवांनीं आणि द्रौपदीनें विचार करून आपले वेष बदलले.

धर्मराजानें कंक असें नांव घेतलें. इथून पुढें कंकभट फांसे खेळून करमणूक करून घेणारा होता. कंकभटानें आणि बाकीच्यांनी विराटाच्या इथें जाऊन रहाण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें ते विराटाच्या राजवाड्यांत गेले भीमानें आचाऱ्याचा वेष घेतला. तो बल्लव झाला. बल्लवाच्या हातांत पळी व झारा होता. बल्लवाला विराट राजाच्या स्वयंपाकघरांत काम मिळालें. बल्लव




रुचकर स्वयंपाक करूं लागला. अर्जुनानें स्त्रीचा वेष घेतला. या बाईला बृहन्नडा म्हणूं लागले बृहन्नडा नाचण्यांत आणि गाणें गाण्यांत तरबेज होती. बृहन्नडेला विराटाच्या मुलीबाळींना गाणें आणि नाचकाम शिकवण्याचें काम मिळालें.

नकुलानें आपल्याला ग्रंथिक हें नांव घेतलें. ग्रंथिक विराटाच्या इथें घोड्यांची परीक्षा करणारा म्हणून राहिला.

सहदेव म्हणाला, 'माझें नांव तंत्रिक. मला गाई, बैल व म्हशी यांची परीक्षा आहे.' विराटानें तंत्रिकाला गौळवाड्यावर गाई, बैल व म्हशी यांना रोग होऊं न देण्यासाठीं, कांहीं आजार झाला तर त्यांच्यावर इलाज करण्यासाठीं नेमिलें.

विराट राजाच्या राणीचें नांव सुदेष्णा असें होतें. सुदेष्णेची दासी म्हणून सैरंध्री हें नांव घेऊन द्रौपदी राहिली.

अज्ञातवासाचें वर्ष संपत आलें. या वर्षांत कोणालाहि हे पांडव आहेत हें ओळखूं आलें नाहीं. कौरवांनाहि पांडवांचा शोध लागला नाहीं. आतां वर्ष संपतांच पांडव हस्तिनापुराला येतील व राज्याचा वांटा मागतील याची काळजी दुर्योधनाला लागली.

त्यांतच त्याला बातमी लागली कीं, विराटाचा सेनापति कुणीतरी मारला. तेव्हां विराटाला सेनापति नसल्यानें त्याचें राज्य जिकावें असें दुर्योधनानें ठरविलें. कोणी म्हणत होतें कीं, भीमानें कीचकास म्हणजे विराटाच्या सेनापतीस मारलें. असें जर असलें आणि भीम तेथें दृष्टीस पडला तर पुनः पांडवांना बारा वर्षें वनवासांत पाठवितां येईल. अशा दोन कारणांनीं तातडतोब. दुर्योधनानें विराटाच्या राज्यावर स्वारी केली. इकडे विराटाला सेनापतीच नव्हता. विराटाचा मुलगा नुसताच बडबड्या होता. त्याचें नांव उत्तर. उत्तर सेना घेऊन निघाला, पण त्याला सारथी नव्हता. तें काम बृहन्नडेनें केलें. भीमहि लढाईवर गेला, पण तो रथांतून लढला. गदा घेऊन लढला असता तर कौरवांनीं त्याला ओळखलें असतें. विराटाच्या सेनेनें अर्जुन व भीम यांच्यामुळें कौरवसेनेचा पराभव केला. कौरव नवल करूं लागले. त्यांनीं दिवस मोजले. ते म्हणाले, 'पांडव हस्तिनापुराला येण्याचा दिवस जवळ आला.'

विराटाला आपल्या राजवाड्यांत वेष बदलून पांडव राहिल्याचें समजतांच तो सर्वांच्या पायां पडूं लागला. 'तुमच्या पराक्रमामुळें माझें राज्य राहिलें.' असें म्हणूं लागला.

पांडव म्हणाले, 'तूं आम्हांला आधार दिलास. आमचें अज्ञातवासाचें वर्ष तुझ्यामुळें चांगलें गेलें. आम्हीं आतां निघतों.'

पांडवांचा अज्ञातवास संपला. आतां ते उघडपणें हिंडूं लागले.

## २३. कोणास काय हवें

पांडवांच्या वनवासाचीं बारा वर्षें संपलीं, अज्ञातवासाचें एक वर्ष संपून गेलें. पांडव उघडपणें हिंडूं लागले. पांडवांनीं आपला मुक्काम विराटनगराजवळच्या उपलव्य नांवाच्या नगरांत ठेवला. पांडवांच्या भेटीला त्यांचे नातलग येऊं लागले. श्रीकृष्ण आला, बलराम आला, द्रुपद आला; सारी मंडळी जमली.

बलराम म्हणाला, 'पांडव व कौरव यांचें कांहींच नुकसान होऊं नये यासाठीं आपण एक चतुर माणूस कौरवांकडे पाठवूं.

त्यामुळें दोघांच्याहि वांटणीला अर्धं अर्धं राज्य येईल. कौरवांकडे विदुर आहे; कृपाचार्य आहेत, द्रोणाचार्य आहेत आणि भीष्म-आजोबाहि आहेत. ते योग्य न्याय करतील.'

या बलरामाच्या बोलण्यावरून एक चतुर पुरोहित कौरवांकडे गेला; पण कौरवांच्या दरबारांत धृतराष्ट्राचें, त्याचा मुलगा दुर्योधन आणि दुर्योधनाचा मित्र कर्ण यांच्यापुढें कांहीं चालेना. दुर्योधनानें विदुराचा, भीष्म आजोबांचा–कोणाचाच सल्ला मानला नाहीं ! दोन–तीन वेळां पांडवांकडून चतुर लोक गेले, पण लढाई-शिवाय राज्याची वांटणी नाहीं असा दुर्योधनानें निरोप दिला.

वांटणीच्या वाटाघाटी चाललेल्या असतांना पांडवांची नातलग मंडळी आपापल्या घरीं गेली होती. कौरव आणि पांडव यांची लढाई होणार हें पक्कें ठरलें आणि मग कौरव पांडव आपापल्या बाजूस एका एका राजास वळवूं लागले.

त्याप्रमाणें एके दिवशीं उजाडण्याच्या आंत अर्जुन आणि दुर्योधन द्वारकेला गेले. अजून उजाडलें नसल्यानें श्रीकृष्ण झोंपलेला होता. पहिल्याप्रथम दुर्योधन श्रीकृष्णाच्या महालांत जाऊन पोहोंचला. श्रीकृष्णाची झोंप मोडूं नये म्हणून तो हळूच महालांत गेला आणि श्रीकृष्णाच्या उशाशीं बसला. थोडयाच वेळानंतर अर्जुनहि तेथें आला. अजूनहि श्रीकृष्णाची झोंप पुरी झालेली नव्हती. श्रीकृष्णाच्या उशाशीं दुर्योधन बसलेला अर्जुनानें पाहिला, म्हणून अर्जुन श्रीकृष्णाच्या पायांजवळ बसला आणि त्याचे पाय रगडूं लागला. श्रीकृष्णाची झोंप पुरी होत आलीच होती. श्रीकृष्ण अंथरुणावर बसला समोरच त्याला अर्जुन दिसला.

श्रीकृष्णानें अर्जुनाला विचारलें, 'कां आलास ?'

अर्जुन म्हणाला, 'तुझी मदत मागण्यास.'

श्रीकृष्ण म्हणाला, 'ती तुला मिळेलच.'

इतक्यांत श्रीकृष्णाचें लक्ष दुर्योधनाकडे गेलें. त्यालाहि त्यानें येण्याचें कारण विचारलें.

दुर्योधन म्हणाला, 'तुझी मदत मागायला आलों !'



श्रीकृष्ण म्हणाला, 'तुम्ही दोघे एकाच कामासाठीं आलांत ?'

दुर्योधन म्हणाला, 'होय.'

श्रीकृष्ण म्हणाला, 'मग असें करा, मी कांहीं लढाईंत शस्त्र हातांत धरणार नाहीं. नुसती तुमची सेवा करीन. तेव्हां असा फक्त एकटा एक मी कोणाकडे येऊं ? आणि माझी सारी एक अक्षौहिणी यादव सेना कोणाला पाहिजे ? बोला.'

दुर्योधनानें विचार केला, 'नुसता एकटा श्रीकृष्ण कशाला हवा; यापेक्षां त्याची सेनाच घेऊं या.'

मग दुर्योधन उघडपणें म्हणाला, 'श्रीकृष्णा, मला तुझी सारी सेना दे.'

श्रीकृष्ण म्हणाला, 'ठीक आहे.'

आपलें काम झालें याचा आनंद होऊन दुर्योधन निघून गेला. आतां राहिला अर्जुन.

श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला, 'तुला रे आतां काय हवें ?'

अर्जुन म्हणाला, 'मित्रा, श्रीकृष्णा, मला फक्त तूं हवास !'

आणि मग दोघांनीं एकमेकांच्या गळ्याला मिठी मारली. श्रीकृष्णाचा चतुरपणा फक्त अर्जुनच ओळखून होता !

## २४. कौरव-पांडवांची लढाई

भीष्म आजोबांनीं दुर्योधनाला पुनःपुन्हां उपदेश केला, पण त्यानें लढाईशिवाय पांडवांना सुईच्या टोंकावर राहील इतकीसुद्धां जमीन द्यायची नाहीं असें ठरविलें. त्यामुळें संजय, श्रीकृष्ण वगैरे सर्वांची शिष्टाई किंवा मध्यस्थी फुकट गेली आणि लढाई सुरू झाली.

पांडवांची सेना पंधरा-वीस कोस पसरली होती, तर तिच्यासमोरील कौरवांची सेना पंचवीस-तीस कोस पसरली होती!

लढाईला आरंभ करण्याच्या वेळीं, कौरवांचे सेनापति भीष्म-आजोबा यांनीं आपला रथ दोन्ही सेनांच्या मधोमध आणला आणि पांडवांच्या बाजूनें श्रीकृष्णानें अर्जुनाचा रथ भीष्म आजोबांच्या समोर आणला.

अर्जुनानें आपल्यासमोर लढाईसाठीं आलेले त्याचे आजे, काके, मामे, मेहुणे पाहिले आणि माया उत्पन्न होऊन तो रडूं लागला. तो श्रीकृष्णाला म्हणाला, 'नको ही लढाई. यांना मारून आम्हांला राज्य नको!'

कृष्णानें अर्जुनाला धीर दिला, उपदेश केला. मग अर्जुन ताळ्यावर आला आणि लढाईला सुरुवात झाली!

लढाईच्या जागेवर रक्ताचे पाट वहात होते! हत्ती, घोडे मरून पडत होते! रथांचा चुराडा होत होता! वीरांच्या अंगांत बाण घुसत होते! सायंकाळीं युद्ध थांबलें कीं कोल्हे, कुत्रीं, तरसें येऊन प्रेतें खात. घुबडें घूं घूं करीत हिंडत. सर्वत्र घाण येई.

अशी ही भयंकर लढाई अठरा दिवस चालली. उजाडलें कीं, शिंगें, तुताऱ्या, शंख यांचा कानठळ्या बसवणारा आवाज ऐकूं येई. 'हाणा मारा!' असे आवाज सारखे ऐकूं येत. बाण शरीरांत घुसल्यामुळें सैनिकांचें विव्हळणें ऐकूं येई. लढाईच्या दुसऱ्या दिवशीं कौरवांची सेना मगरीसारखी पसरली आणि पांडवांची सेना क्रौंच पक्ष्याप्रमाणें दिसूं लागली. भीष्म आजोबा व अर्जुन यांची



लढाई झाली. कौरव–पांडव यांच्याकडील हजारों सैनिक मरण पावले.

तिसऱ्या दिवशीं आजोबांनीं गरुडासारखी सेनेची रचना केली, तर पांडवांची सेना अर्ध्या चंद्रासारखी दिसूं लागली. भीष्मांनीं अर्जुनाला बेशुद्ध केलें, त्यामुळें श्रीकृष्ण फार रागावला.

चौथ्या दिवशीं दोन्ही सेना सापासारख्या वांकड्या तिकड्या दिसत होत्या. पांचव्या दिवशीं पांडवांनीं ससाण्यासारखी सेनेची रचना केली आणि कौरवांनीं मगरीसारखी केली. सहाव्या दिवशीं भीम फार शूरपणानें लढला. सातव्या दिवशीं दुर्योधन भीमापुढून पळून गेला. आठ दिवसांच्या लढाईंत पांडवांकडील एकहि मोठा वीर मेला नाहीं, याचा दुर्योधनाला राग आला. दहाव्या दिवशीं भीष्म बेशुद्ध होऊन पडले. भीष्म आजारी झाल्यानें अकराव्या दिवशीं द्रोण सेनापति झाला. तो कांहीं आटोपेना, तेव्हां पांडवांनीं आवई उठवली कीं, अश्वत्थामा मेला ! खरोखरच अश्वत्थामा नांवाचा हत्ती मेला होता. अश्वत्थामा मेल्याचें ऐकून द्रोणांना दुःख ालें. अभिमन्यु, द्रोण, द्रुपद, घटोत्कच असे अनेक मोठमोठे वीर

पुरुष मरत होते; तरी लढाई चाललीच होती.

शेवटीं सारे कौरव व त्यांची सेना मेली. पांडवांकडीलहि सारी सेना मेली. उरले फक्त पांच पांडव आणि श्रीकृष्ण.

दुःशासन मेला, कर्ण मेला, शल्य मेला, शकुनि मेला; कौरवांची सारी सेना खलास झाली. शेवटीं दुर्योधन उरला. भीमानें गदेचा टोला हाणून त्याला ठार केलें. आणि ही अठरा दिवस चाललेली भयंकर लढाई संपली.

धृतराष्ट्र व गांधारी यांना फार दुःख झालें. विदुरानें आणि व्यासांनीं त्यांची समजूत घातली.

यांतच बरेच दिवस गेले आणि मग हस्तिनापूरच्या राज्यावर धर्मराजाला बसविण्याचें ठरविण्यांत आलें.

## २५. पांडवांचा जयजयकार

कौरव-पांडवांचीं महाभयंकर अशी लढाई अठरा दिवसांत संपली, पण लढाईत मेलेल्या नातेवाइकांचें दुःख विसरणार कसें? पुष्कळ दिवस लोटले. दुःख कमी वाटूं लागलें. मग एके दिवशीं रथांत बसून मंडळी निघाली.

धर्माचा रथ भीम हांकीत होता. एक सुंदर छत्र अर्जुनानें धर्मावर धरलें होतें. नकुलाच्या आणि सहदेवाच्या हातांत चवऱ्या होत्या, त्या चवऱ्यांनीं धर्माला ते वारा घालीत होते.

श्रीकृष्ण पांडवांबरोबर होता.

पांडव हस्तिनापुराला यायला निघाले आहेत हें कळतांच हस्तिनापूरच्या लोकांनीं केशर-कस्तुरीचे सडे घातले. तोरणें, गुढ्या घरांवर दिसूं लागल्या. बायका-मुलांनीं, म्हाताऱ्यांनीं पांडवांना पहाण्यासाठीं गच्चीवर, खिडक्या-खिडक्यांतून, रस्त्यांवरून गर्दी केली! सनईसारखीं मंजुळ वाद्यें वाजत होतीं. सुवासिनी पंचारती घेऊन पांडवांना ओवाळण्यासाठीं उभ्या होत्या. राजवाड्यावर विशेषच लखलखाट दिसत होता. कारण राजवाड्यावर सोनेरी कळस मुद्दाम बसविले होते.

हस्तिनापूरच्या लोकांनीं पांडवांचें मनापासून स्वागत केलें

आदर केला, सत्कार केला; तरीहि धर्म सिंहासनावर बसेना. मग राज्यांतल्या मोठमोठ्या शेठ सावकारांनीं, ऋषि-मुनींनीं त्याला आग्रह केला. श्रीकृष्णांनीं धर्माला सिंहासनावर बसणें कसें योग्य आहे हें सांगितलें, तेव्हांच धर्मराज हस्तिनापूरच्या सिंहासनावर बसला.

धर्माला राज्यावर बसतांना अभिषेक केला. श्रीकृष्ण, धृतराष्ट्र आणि मोठमोठे लोक यांनीं त्याच्यावर सातहि समुद्रांतून आणि मोठमोठ्या पवित्र नद्यांतून आणलेलें पाणी शिंपडलें. धर्माच्या राज्यांत भीम युवराज झाला. अर्जुन सेनापति झाला. नकुल आणि सहदेव धर्माला मसलत देऊं लागले. युयु सुकडे राज्याचा कायदा कोणता हें पहाण्याचें काम दिलें. धौम्य मुनि पाहुण्यांची व्यवस्था बघूं लागले.



IRBK-0116556
IRBK-0116556

एके दिवशीं धृतराष्ट्रानें भीमाला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. भीम त्याला भेटण्यास निघणार तोंच श्रीकृष्णाला शंका आली. तो म्हणाला,

‘ बा धर्मा, या विश्वांतील सर्वच लोक तुझ्यासारखे उदार व

९६०५४: आ।६



विश्वासू नाहींत. मला यांत धृतराष्ट्राचें कपट दिसतें. म्हातारा महाशक्तिमान आहे. पुत्रशोकानें संतापलेला तो भीमाचें आलिंगून चूर्ण करील. तरी भीमाला फक्त लांबून बोलण्यापुरता पाठव व प्रेमालिंगनाच्या वेळीं भीमाचा लोखंडी पुतळा पुढें कर.'

कृष्णाच्या मसलतीप्रमाणेंच करण्यांत आलें व जेव्हां धृतराष्ट्रानें लोखंडी पुतळ्याचेंहि चूर्ण केलें तेव्हां श्रीकृष्णाच्या तीक्ष्ण बुद्धीचा सर्वांना प्रत्यय आला.

जेव्हां धृतराष्ट्राला कृष्णानें आपली फसगत केल्याचें दिसून आलें तेव्हां त्यानें खराखुरा पश्चात्ताप व्यक्त केला.

ठिकठिकाणच्या राजांनीं धर्माला मोठमोठे आहेर केले. हिरे, माणकें इत्यादि रत्नांचें आणि सोन्याच्या दागिन्यांचे तसेच उत्तमोत्तम रेशमी वस्त्रांचे ढीग धर्मराजापुढें येऊन पडले.

कांही दिवसांनीं व्यास धर्माला म्हणाले, 'तूं आतां मोठा होम कर. त्याला अश्वमेध म्हणतात. त्यासाठीं वीस हजार ब्राह्मणांना मंत्र म्हणायला बसव. एक घोडा मोकळा सोड. जो कोणी त्या घोड्याला अडवील, त्याच्याशीं लढून त्याचें राज्य घे. कोणींहि राजा तुझ्याबरोबर लढला नाहीं कीं तूं सर्व पृथ्वीचा महाराजा होशील.' याप्रमाणें धर्मानें केलें. धर्माचा घोडा कोणीहि अडवला नाहीं. धर्म पृथ्वीचा महराजा झाला.

भीम, अर्जुन, नकुल आणि धर्म, सहदेव यांच्या वडील माणसांच्या व श्रीकृष्णाच्या विचारानें राज्य चालवीत होता. त्यामुळें पांडवांच्या राज्यांत कोणी गरीब राहिला नाहीं, कोणी दुःखी राहिला नाहीं, उपाशी राहिला नाहीं.

धर्माच्या राज्यामुळें आणि बाकीच्या चौघांच्या कारभारामुळें राज्यांत सुख, शांति व समाधान नांदूं लागलें.

आणि लोक सगळीकडे पांडवांचा जयजयकार करूं लागले.

'पांची पांडवांचा जयजयकार असो!'

'पांची पांडवांचा जयजयकार असो!'

**समाप्त**